दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक ३६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.७ मे २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## रानवली धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

आराठी व रानवली पंचक्रोशीतील गावांना तसेच श्रीवर्धन शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या रानवली धरणात एका तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना ५ मे रोजी घडली असून श्रीवर्धन पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे.

रानवली येथील मयत तरुण हर्ष प्रमोद चोरगे वय १६ वर्ष रानवली येथील धरणात पोहण्यासाठी गेला होता. मात्र त्याला पोहता येत नसल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे नमुद करण्यात आलं आहे. सदर मृत झालेल्या तरुणाचा काल वाढदिवस होता. तब्बल पंधरा ते सोळा तासांनी मयत तरुणांचा मृतदेह सापडला आहे. मात्र हजारो नागरिक ज्या धरणातील पाणी पिण्यासाठी वापरतात अश्या धरणात पोहण्यासाठी पाटबंधारे विभाग परवानगी कशी देत असा प्रश्न उपस्थित होत आहे? अन्यथा पाटबंधारे विभागाने धरणावर अश्या प्रकारचे कृत्य थांबण्यासाठी एक माणूस कायमस्वरूपी वास्तव्यास ठेवण्याची गरज आहे. सदर पाटबंधारे विभागाच्या होत असलेल्या दुर्लक्षा बाबत नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

# खारघरमधील पाणीपुरवठ्यात ३१ मेपर्यंत सुधारणा न झाल्यास सिडको भवनमध्ये घुसणार :आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**खारघर येथील अनियमित व अपुर्या पाणीपुरवठ्यात ३१ मेपर्यंत सुधारणा न झाल्यास कोणतीही नोटीस न देता सिडको भवनमध्ये घुसून पाणी मिळत नाही तोपर्यंत तेथेच मुक्काम करू, असा जाहीर इशारा भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (शुक्रवारी, दि. ६) खारघर येथील आंदोलनप्रसंगी दिला.**



सिडकोने वसविलेल्या खारघरमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. येथील नागरिकांना अनियोजित पाणीपुरवठ्याचा त्रास होत असल्याच्या अनेक तक्रारी सिडको कार्यालयात करण्यात आल्या आहेत. प्यायला पाणी नाही, पण सिडको नवीन प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र देत सुटली आहे. फक्त ५० टक्के पाणीपुरवठा होतो. या संदर्भात भाजप खारघर-तळोजा मंडलच्या वतीने वेळोवेळी सिडकोकडे पाठपुरावा करण्यात आला, मात्र याकडे सिडको दुर्लक्ष करीत असल्याने खारघर सेक्टर १४ येथे सुरू असलेल्या गृहसंकुलाचे बांधकाम व खारघर रेल्वे स्टेशनच्या पूर्वेला सुरू असलेल्या गृहसंकुलाचे बांधकाम आपण पूर्णपणे बंद पाडण्यासह खारघर येथील अनियमित पाणीपुरवठ्याबाबत भारतीय जनता पक्षातर्फे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात भाजप खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती 'अ'च्या सभापती संजना कदम, नगरसेवक हरेश केणी, अभिमन्यू पाटील, प्रकाश बिनेदार, बबन मुकादम, प्रवीण पाटील, शत्रुघ्न काकडे, रामजी बेरा, निलेश बाविस्कर, पापा पटेल, नगरसेविका अनिता पाटील, नेत्रा पाटील, आरती नवघरे, कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, अल्पसंख्याक सेल प्रदेश सचिव मन्सूर पटेल, उत्तर रायगड सरचिटणीस इर्शाद पटेल, खारघर भाजपचे शहर सरचिटणीस दीपक शिंदे, अजिंक्य नवघरे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, निर्दोष केणी, संजय घरत, महिला मोर्चाच्या बिना गोगरी, गीता चौधरी, मोना अडवाणी, प्रभाग क्रमांक ३चे अध्यक्ष मुनाफ पटेल, युवा मोर्चा खारघर अध्यक्ष विनोद घरत, डॉ. कृष्णा देसाई, कामोठे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, भाजप नेते वासुदेव पाटील, अमर उपाध्याय, साधना पवार, प्रतीक्षा कदम, अनिता जाधव, समीर कदम, अंकिता वारंग, कांचन बिर्ला, विपुल चौटालिया, अजय माळी, राजेंद्र मांजरेकर, सचिन वास्कर, संदीप रेड्डी, नवनीत मारू, राजेंद्र अग्रवाल, रूपेश चव्हाण, माधवी कोडरू, दुर्गा बन्सल, शैलेंद्र त्रिपाठी, सुमित शहा, विनोद ठाकूर, अनिल साबणे, लखवीरसिंग सैनी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना आंदोलन केल्याशिवाय सिडकोला काही ऐकूच येत नाही. त्याशिवाय सिडको कोणतेही काम करीत नसल्याचा आपल्याला अनुभव आहे. त्यामुळे आज सगळ्यांना कडक उन्हात येथे बसून आंदोलन करावे लागत आहे. या भागात जवळजवळ एक लाख नवीन घरे बांधली जात आहेत. या घरांत सुमारे पाच लाख लोक राहायला येतील. आज येथील लोकांना पुरेसे पाणी मिळत नसताना हे नवीन लोक राहायला आल्यावर येथील पाण्याच्या परिस्थितीची कल्पनाच करता येणार नाही म्हणून आज हे आंदोलन करावे लागत आहे.

खारघर, कामोठे, तळोजा या नोडमधील पाण्याच्या प्रश्नासाठी अनेक वर्षे जॉईंट एमडीची नेमणूक करण्याची मागणी केल्यावर या नोडसाठी त्यांची नेमणूक झाली, पण पाण्याची समस्या सुटली नाही. बाळगंगा व कोंढाणे धरणाच्या कामात मोठा घोटाळा झाल्याने त्यांचे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे नवीन येणार्या नागरिकांना पाणी कसे देणार असा प्रश्न विचारला की, सिडको पाताळगंगा धरण आणि पनवेल महापालिकेच्या धरणाची पातळी वाढवून पाणी घेता येईल असे सांगते, पण हे फक्त कागदावरच असते. मी सिडकोचा अध्यक्ष असताना एमडींना तांत्रिक सल्लागार नेमणे आवश्यक असल्याचे सांगितल्यावर टाटा कन्सल्टन्सीची नेमणूक करण्यात आली. त्यांच्यासोबत स्थानिक नगरसेवक व सोसायटी अध्यक्ष यांचीही बैठक घेण्यास सांगूनही घेतली जात नाही. सिडको या भागात ठेकेदारामार्फत पाण्याचे वाटप करते. त्यामुळे अनेक भागांत पुरेसे पाणी मिळत नाही, तर काही भागांत २४ तास पाणी दिले जाते. नवी मुंबई महापालिकेप्रमाणे येथेही ऑटोमॅटिक सिस्टिमचा वापर करण्याची आमची मागणी आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

पनवेल महापालिका २०१६ मध्ये स्थापन झाली. आम्ही सिडकोकडून रस्ते, कचरा व पाणी यांसारख्या एक-एक सेवा ताब्यात घेत आहोत. रस्त्यांची कामे करून देण्यास सिडकोने वेळ लावल्याने या सेवा ताब्यात घेण्यास वेळ लागत आहे. सिडकोने विकास खर्चाच्या नावाखाली पैसा घेतला असल्याने त्यांनी ही कामे करून देणे आवश्यक आहे. कोविड नसता, तर केंद्राची अमृत योजना पूर्ण झाली असती व पाण्याचा प्रश्न सुटला असता. आम्हाला सिडकोवर अवलंबून राहावे लागले नसते, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी नमूद केले. सिडको कार्यकारी अभियंता एन. जे. चौथानी यांनी आमची भेट घेऊन २० तारखेपर्यंत सगळे सुरळीत होईल, असे सांगितले, पण लोकांचा त्यांच्यावर आता विश्वास नाही. त्यामुळे ज्या सोसायटीत पाणी येणार नाही त्यांना सिडकोने मोफत टँकरने पाणीपुरवठा करावा; अन्यथा सिडकोच्या अधिकार्यांचे पत्ते शोधून पाण्याची भांडी घेऊन त्यांच्या घरी जाऊ, त्यांना झोपू देणार नाही, त्यांच्या घरून पाणी आणू, असे सांगून त्यांना आम्ही ३१ मेपर्यंत मुदत देतो. त्यांनी एमडींना सांगून कारभारात सुधारणा करावी; अन्यथा आम्ही सिडको भवनमध्ये घुसल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला.

## पालिकरांच्या नशिबी बाराही महिने दुषित पाणी

### अंबा नदीचे पाणी झाले चिखलयुक्त

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या व सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली शहराला येथील अंबा नदीतून थेट पाणीपुरवठा केला जातो. मात्र हे पाणी दूषित व दुर्गंधीयुक्त असल्याच्या तक्रारी कायम वाढतच आहेत. गुरुवारी अंबा नदीच्या पाण्यात अचानक चिखल व गाळ आल्याने पाणी प्रचंड गढूळ झाले होते. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले. उन्हेरे येथील धरणातील चिखलयुक्त पाणी सोडल्याने अंबा नदीचे पाणी गढूळ झाले होते.

चिखलामुळे अंबा नदीचे पाणी पूर्णपणे मातकट रंगाचे झाले होते. शिवाय असे गढूळ पाणी नळाद्वारे नागरिकांना आले. नळाद्वारे अचानक गढूळ पाणी आल्याने नागरीकांनी चिंता व्यक्त केली. अशातच रोज मरे त्याला कोण रडे, ही परिस्थिती याठिकाणी असून पालिकरांच्या नशिबी वर्षाचे बारा महिने दूषित पाणी असल्याचे वास्तव आहे.

याशिवाय अंबा दिला प्रदूषणाचा विळखा पडला आहे. शहरातील सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते थेट अंबा नदीपात्रात सोडले जात आहे. येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करणारा कोणताच प्रकल्प पालीत उपलब्ध नाही. तसेच तब्बल २० कोटींची शुद्धपाणी योजना देखील लालफितीत अडकलेली आहे. परिणामी भाविक व नागरिकांना नाईलाजाने हे गढूळ व प्रदूषित पाणी वापरावे लागत आहे. आत्ता पर्यंत नळाच्या पाण्यातून साप, बेडूक, शंखशिंपले व मासे आदी प्राणी आले आहेत. याबरोबरच शेवाळ व चिखल हे नेहमीच येत असते. आजूबाजूच्या कारखान्यांतून प्रदूषित पाणी देखील अंबा नदीमध्ये सोडले जाते. अनेक नागरिक प्रदूषित पाणी पिण्यापेक्षा कूपनलिका व विहीरीचे पाणी पिण्यावर भर देत आहेत. बहुतांश जण विकतचे बाटलीबंद पाणी पितात. नियमित पाणीपट्टी भरून देखील लोकांना असे प्रदूषित पाणी मिळत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.



## संक्षिप्त...

### नवी मुंबईच्या पावणे एमआयडीसीतील कंपनीला भीषण आग



**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

नवी मुंबईच्या पावणे एमआयडीसीतील एका रासायनिक कंपनीला भीषण आग लागली आहे. आज ( ६ मे) दुपारी ही आग लागली. आगीनं काही वेळातच रौद्ररूप धारण केले. त्यानंतर ही आग पसरली घटनास्थळी पाच अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या आहेत. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहे.घटनास्थळी गर्दी न करण्याचे तसेच अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

नवी मुंबईच्या पावणे एमआयडीसीतील वेस्ट क्लाय पॉलिकॅब या रासायनिक कंपनीला आग लागली आहे.ही आग इतकी भीषण आहे की, या आगीत आजूबाजूच्या चार कंपन्या जळून खाक झाल्या आहे. कंपनी चार कर्मचारी अडकल्याची शक्यता वर्तवण्यात आहे.

मात्र अग्निशमन दलाकडून या वृत्ताल अधिकृत दुजोरा दिलेला नाही. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहे. आग कशामुळे लागली याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

## रिक्षा स्टँड खुले करुनही शहरातील वाहतुक कोंडी कायम

### वाहतुक कोंडी करणाऱ्या सर्व वाहनांवर कारवाई होणार का..?

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत शहरातील रिक्षा स्टँड खुले करुनही शहरातील वाहतुक कोंडी कायम, वाहतुक कोंडी करणा-या सर्व वाहनांवर कारवाई होणार का..? असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गंगावणे यांनी उपस्थित केला आहे.



अधिकृत रिक्षा स्टँड न मिळाल्याने काही दिवसांपुर्वी फिरस्त्या रिक्षा धारकांनी अधिकृत रिक्षा स्टँड मध्ये सामावुन घेण्यासाठी उपोषणे, आंदोलने आणि खुप मोठा संघर्ष केला. त्यामुळे संबंधित विभागातील शासकीय अधिकारी तसेच राजकीय पुढारी नेते व सामाजिक कार्यकर्ते यांच्या मध्यस्थीने सर्व फिरस्त्या रिक्षाधारकांना शहरातील सर्व अधिकृत रिक्षा स्टँड मध्ये सामावुन घेऊन एकमेकांना पेढे भरवुन विरोधातील वाद देखील मिटवला गेला.

परंतु, आजही अनेक रिक्षाचालक शहरातील रस्त्यांवर कुठेही, वाकड्या तिकड्या रिक्षा लावुन वाहतुक कोंडी करत आहेत शिवाय पादचाऱ्यांना देखील रस्त्यावर चालताना अडथळा करत आहेत. सर्वच रिक्षा धारकांना मुख्य बाजारपेठेतुन व रेल्वे स्थानक परिसरातुनच रिक्षा व्यवसाय करायचा आहे असे दिसत आहे. कारण, शहरातील बहुतांशी अधिकृत रिक्षा स्टँड रिक्षांविना ओस पडले आहेत. त्यामुळे शहरातील नागरिकांना, महिलांना, वयोवृद्धांना, आजारी रुग्णांना आपल्या परिसरातुन इच्छित स्थळी जाण्यास रिक्षा मिळत नसल्याने त्यांची खुपच परवड होत आहे. तरी, संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी ह्याची दखल घेऊन वाहतुक कोंडी करणा-या रिक्षाधारकांसह .../२

## पनवेलच्या अर्थसंकल्पिय विशेष सभेत विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे आक्रमक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर पालिकेची अर्थसंकल्पिय सभा पनवेलच्या क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडली. या वेळी आपले अर्थसंकल्पिय निवेदन सादर करताना स्थायी समिती सभापती शत्रुघ्न काकडे यांनी देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री, राज्याचे विरोधी पक्ष नेते आदींची नावे घेतली. परंतु रायगड जिल्हाच्या पालकमंत्री कु अदितीताई तटकरे, खासदार अप्पासाहेब बारणे, तसेच कोकण शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांची नावे न घेतल्याने पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे आक्रमक झाले आणि या बाबत तीव्र निषेध नोंदविला.

त्यांच्या सोबत सर्वच विरोधी पक्षाचे नगरसेवक आक्रमक झाले होते. या वेळी सभापतींना या बाबत विचारले असता त्यांनी हे आपले वैयक्तिक मत असल्याचे सांगितले. यामुळे सभागृहात गोंधळ झाला होता. स्थायी समिती सभापती हे संविधानातिक पद असून या पदावर असलेली व्यक्ती कोण्या एका पक्षाचा नसून तो संपूर्ण महानगरपालिकेचा असतो. नियमानुसार प्रथम अर्थसंकल्प हा स्थायी समितीमध्ये सादर केला जातो, त्यावेळेस तो स्थायी समिती सदस्यांना दिला जातो. नंतर तो सर्वसाधारण सभेत सादर केला जातो. सर्वसाधारण सभेअगोदर हा अर्थसंकल्प सर्व नगरसेवकाना दिला जातो जेणेकरून ते त्यावर अभ्यास करून आपली मते मांडतील. मात्र पनवेल महानगरपालिकेने तसे न करता काल ५ मे रोजी सकाळी सभे मध्ये हा अर्थसंकल्प उर्वरित नगरसेवकांना दिला. मग आम्ही या वर अभ्यास केव्हा करणार आणि आमची मते केव्हा मांडणार असे सांगत. विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षाच्या सर्व नगरसेवकांनी निषेध करत सभात्याग केला.

## महावितरणकडून वीज ग्राहकाना सुरक्षा ठेवीचा 'शॉक', अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बिल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महावितरणने भर उन्हाळ्यात ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा शॉक दिला आहे. त्यामुळे आधीच महागाईने होरपळून निघालेल्या नागरिकावर सुरक्षा ठेवीचे अतिरिक्त ओझा जमा झाला आहे.

कोरोना महामारीच्या संकटातून तावून निघाल्यावर महागाईनेही डोके वर काढले आहे. सध्या इंधन दरवाढीच्या झळा नागरिकांना सोसाव्या लागत आहेत. जीवनावश्यक साहित्याच्या किमतीही महागल्याने सामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. त्यामध्ये आता महावितरणनेही हातपाय पसरले आहेत. वीज ग्राहकांची पूर्वीपासून संचित असलेली अतिरिक्त सुरक्षा ठेव तशीच असताना कंपनीने नव्याने अतिरिक्त सुरक्षा ठेवीची बिले नुकतीच दिली आहेत. महावितरणने वीजबिलांसोबत ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बिलही दिले आहे. त्यातून कोट्यवधी रुपये वीज ग्राहकांच्या खिशातून वसूल केले जाणार आहेत. अगोदरचं महागाईने सामान्य ग्राहक होरपळून निघाले आहेत.

भरमसाट वीजबिलाने ग्राहकांचे कंबरडे मोडले आहे. त्यातच महावितरणने ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा 'शॉक' दिला आहे. त्यामुळे वीज ग्राहक हवालदिल झाले असून, ठेवीचे पैसे भरायचे कोठून हा प्रश्न त्यांच्यापुढे उभा आहे. त्यामुळे ग्राहकांतून संताप व्यक्त होत आहे. महावितरणच्या वीजग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे स्वतंत्र बिल देण्यात येत आहे. सद्यस्थितीत वीज ग्राहकांना नियमित वीजबिलांसह .../२

## छत्रपती शिवाजी, शाहू महाराज यांना अपेक्षित समाज, राज्य निर्मितीसाठी एकत्र येऊया : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ज्या वृत्ती विरोधात छत्रपती शाहू महाराज लढले ती वृत्ती आज खरोखर संपली आहे का याचा विचार करण्याची गरज आहे. ती वृत्ती आता जिथे जिथे जिवंत असेल तिथे तिथे लढूया व सामाजिक समता स्थापित करून छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती शाहू महाराज यांना अपेक्षित असलेला समाज आणि राज्य निर्माण करण्यासाठी एकत्र येऊन काम करू, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा १०० वा स्मृतिदिन हा कृतज्ञता पर्व म्हणून साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त शाहू मिल येथे आयोजित कृतज्ञता सभेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे दूरभाष प्रणालीद्वारे मार्गदर्शन करत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार हे दूरभाष्य प्रणालीद्वारे पुणे येथून उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. शाहू छत्रपती महाराज होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले, प्रबोधनकार आणि छत्रपती शाहू महाराज यांचे ऋणानुबंध ऐकत मी मोठा झालो. आजोबांनी त्यांची जीवनगाथा लिहिली त्यात हे नाते नमूद केले आहे. आज देखील शाहू महाराज कोल्हापूरात आहेत असे वाटते. ते आपल्यातून जाऊन १०० वर्षे झाली हे जाणवत नाही. छत्रपती शाहू महाराज हे महामानव होते. महाराजांची केवळ २८ वर्षाची कारकिर्द. ४८ व्या वर्षी शाहू महाराजांचे निधन झाले. असे वाटते की, त्यांना आणखी आयुष्य मिळालं असते तर आज पायाभूत सुविधांच्या बाबतीत नाही तर समाज सुधारणेच्यादृष्टीने राज्याचे वेगळे चित्र असते.

आज आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना छत्रपती शाहू महाराजांचे १०० वे स्मृतीवर्ष साजरे करत आहोत. अस्पृश्यांचा उद्धार, शिक्षण प्रसार, धरणे, वसतिगृहे, कृषी, उद्योग क्षेत्रात राजर्षि शाहू महाराजांचे काम डोंगराएवढे. हा दूरदृष्टी असलेला राजा, आज या कामासाठी वेगवेगळे विभाग आहेत पण या सगळ्या खात्यांचे काम एका माणसाने केले असे सांगून श्री. ठाकरे पुढे म्हणाले की, .../२

# ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेतल्या तर हा ओबीसी समाजावर अन्याय असेल : ॲड.मनोज भुजबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मा. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदे-शानुसार ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घ्याव्या, पण निवडणुका झाल्या पाहिजे. प्रशासक जर कारभार बघणार असेल तर लोकशाहीचा हा गळाघोटेपणा आहे. ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेतल्या तर हा ओबीसी समाजावर अन्याय असेल असे प्रतिपादन ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.मनोज भुजबळ यांनी केले.

शासनाने गेल्या ३० वर्षाच्या काळात काहीही काम केलेले नाही. समर्पित आयोग तयार करून त्या अंतर्गत त्रिसुत्री तयार करुन कोर्टात दाखल करायला सांगितली होती. एम्पेरिकल डाटा तयार करून तो सादर करायचा होता पण



सरकार जर टोलवाटोलवी करत असेल की हे केंद्र सरकारचे काम आहे तर हा ओबीसी समाजाची फसवणूक आहे असेही भुजबळ म्हणाले.

ते पुढे म्हणाले, जर ४ मार्च २०२१ ला कोर्टाने निर्णय दिला असेल की समर्पित आयोग तयार करा आणि तो ११ मार्च २०२२ ला सादर केला तर एक वर्ष हे सरकार का थांबले होते? म्हणजे ही ओबीसी समाजाची फसवणूक आहे. एक लोकप्रतिनिधी आणि ओबीसी समाजाचा कार्यकर्ता म्हणुन माझी अशी मागणी आहे की या निवडणुका ओबीसी आरक्षण ठेवूनच घेतल्या पाहिजेत.

# श्री सदस्य परिवारास बैठकीसाठी सिडकोच्या माध्यमातून आरक्षित भूखंड मिळावा

## नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे शिवसेनेने मागणी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना रायगड चे नवनिर्वाचित जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील यांनी आज महाराष्ट्र राज्याचे नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. व नावडे येथील श्री सदस्य परिवारास बैठकीसाठी सिडकोच्या माध्यमातून आरक्षित भूखंड मिळावा ही मागणी केली. यावेळी बबन पाटील ह्यांचे नियुक्तीबद्दल एकनाथ शिंदे ह्यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

ह्याचसोबत नावडे येथील श्री सदस्य परिवारास बैठकीसाठी सिडकोच्या माध्यमातून आरक्षित भूखंड मिळावा ह्यासाठी आज बबन पाटील ह्यांनी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे ह्यांच्याकडे निवेदन दिले.

ह्यावेळी पनवेल महानगर संघटक प्रथमेश सोमण, विभागप्रमुख गणेश म्हात्रे, तळोजे शहर संपर्कप्रमुख मुरलीधर म्हात्रे आदी उपस्थित होते.

मा.पांडे साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.नरेश टी. म्हसकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रि.एम.ए.क्र.५४९/२०२२
ने.ता.१०/०६/२०२२

सौ.जागृती संदीप टाकळे
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.३०७, सुखसागर बिल्डींग, पंचरत्न हॉटेल जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बे
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.नंदकुमार परशुराम तांबोळी यांचा मृत्यू दि.०४/०४/२००४ रोजी मौजे : मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मोर्बे ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत झालेला आहे. अनावधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करणेची राहून गेली आहे. सब अर्जदार यंनी त्यांचे वडील कै.नंदकुमार परशुराम तांबोळी यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता आदेश मिळणेबाबत पनवेल येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू कै.नंदकुमार परशुराम तांबोळी हे वर नमूद ठिकाणी मयत झालेले आहेत किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.६/०५/२०२२ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

ॲड.तनिष्का यतीन अहिर

### जाहीर नोटीस

कर्जत येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
चौ.अर्ज क्रं.८६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०१/०७/२०२२

१) श्री.प्रशांत चंद्रकांत जोशी व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी १) श्री.प्रशांत चंद्रकांत जोशी, २) प्रणिता राजेश टोपे व ३) सौ.प्रणाली रवींद्र जोशी यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी चौ.अर्ज क्र.८६/२०२२ दाखल केला आहे. सदरहू अर्जामध्ये अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील कै.चंद्रकांत बळीराम जोशी हे दि.२४/०९/२०१८ रोजी मौजे : शिवाजी नगर दहिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई नलिनी चंद्रकांत जोशी हे दि.२०/०९/२००७ रोजी आदित्य हॉस्पिटल अंबरनाथ येथे मयत झालेले असून अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत असे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांनी अर्ज केला आहे.

कै.चंद्रकांत बळीराम जोशी व नलिनी चंद्रकांत जोशी यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस दाखला देण्याबाबत संबंधित नातेवाईक, हितसंबंधित व इतर यांची काही हरकत असल्यास त्यांनी कागदपत्रांसह तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत दि.०१/०७/२०२२ पूर्वी या न्यायालयात दाखल करावी. जर मुदतीमध्ये कोणतीही हरकत किंवा तक्रार न आल्यास अर्जदारांना त्यांच्या विनंतीनुसार वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस आज दि.०५/०५/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/- क.लिपीक दि.न्याया, कर्जत — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया, कर्जत

पृष्ठ क्र.१ वरुन...

## रिक्षा स्टँड खुले करुनही शहरातील वाहतुक कोंडी कायम

इतर वाहनांवर देखील कायदेशीर कारवाई करावी. तसेच रेल्वे स्थानकाव्यतिरिक्त शहरातील इतर रिक्षा तळांवरुन देखील रिक्षाधारकांना व्यवसाय करण्यास सुचना कराव्यात. जेणेकरून शहरातील सर्व सामान्य नागरिकांची होणारी गैरसोय दुर होईल असे मत प्रभाकर गंगावणे यांनी व्यक्त केले आहे.

## महावितरणकडून वीज ग्राहकाना सुरक्षा ठेवीचा 'शॉक', अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बिल

अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे स्वतंत्र बिल देण्यात येत आहे.

वीज बीलांसोबत महावितरणच्या लाखो ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बील देण्यात आली आहेत. त्यामुळे वीज ग्राहकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

## राज्य निर्मितीसाठी एकत्र येऊया : मुख्यमंत्री

स्वातंत्र्याचे वारे वाहत असतांना अनेक राजे होऊन गेले. नुसते गादीवर बसले म्हणून राजे झाले असेही अनेकजण होते. पण शाहू महाराज हे गादीवर बसलेले राजे नव्हते. या राजाने सातत्याने दीनदुबळ्यांसाठी काम केले, त्यांच्यासाठी संघर्ष केला. त्यांनी अस्पृश्यांना समानतेने वागवण्यासाठी संघर्ष केला. याचा उल्लेख प्रबोधनकारांनी आपल्या पुस्तकात केला आहे. माणसाला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार दिले पाहिजेत, ते देण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी जे काम केले ते मार्गदर्शक आहे.

शाहू महाराज हे लोकोत्तर राजा. त्यांनी गोरगरिबांसाठी काम केले. त्यांच्या जाहीरनाम्यात माझ्या राज्यातील जनता सुखी समाधानी असले पाहिजे हे वचन होतं. आज जी वृत्ती दिसते आहे त्याच्याविरोधातच शाहू महाराज लढले. आजोबांकडून जे ऐकले, मी वाचले त्यावरून दिसते की छत्रपती शाहू महाराज कोणत्या व्यक्ती विरोधात नव्हते तर वृत्तीविरोधात होते. वंचित वर्गासाठी छत्रपती शाहू महाराजांनी काम केले. शिक्षणातील भेदभाव दूर करण्याचे काम शाहू महाराजांनी केले. छत्रपती शाहू महाराजांना वंदन करतांना त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून पुढे जाऊया, असे आवाहन श्री. ठाकरे यांनी यावेळी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या पुरोगामी विचारावर राज्य चालत असून प्रत्येक पिढीने शाहू विचारांचा अंगिकार केला पाहिजे. शाहूंच्या विचारांचा जागर नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी हे कृतज्ञता पर्व महत्त्वाचे आहे असे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा शाहू महाराजांनी पुढे नेला. शाहू महाराजांचे काम हे डोंगरा एवढे मोठे असून त्यांचा प्रत्येक विचार हा क्रांतिकारी होता. त्यांच्या सामाजिक न्याय विचारावरच सामाजिक क्रांती घडली, असेही त्यांनी यावेळी विशद केले. तसेच छत्रपती शाहू महाराज हे रयतेचे काळजी घेणारे, आधुनिकतेचा स्विकार करणारे व दूरदृष्टी असलेले लोकराजा होते व त्यांनी सर्व जाती धर्मांना एकत्रित ठेवून विविध क्षेत्रात विकास घडवून आणला.

यावेळी व्यासपीठावर महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, ग्रामविकास व कामगार मंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, पालकमंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील यड्रावकर, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, महाराष्ट्र राज्य कृषी प्रशिक्षण व संशोधन केंद्राचे उपाध्यक्ष प्रकाश आबिटकर, छत्रपती संभाजीराजे, छत्रपती मालोजीराजे, खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, आमदार शिक्षक मतदार संघ पुणे विभाग जयंत आसगावकर, आमदार विनय कोरे, आमदार पी. एन. पाटील, आमदार राजेश पाटील, आमदार राजू आवळे, आमदार श्रीमती जयश्री चंद्रकांत जाधव, सचिव वैद्यकीय शिक्षण महाराष्ट्र राज्य सौरभ विजय, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, महानगरपालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# विचारणा करण्यास गेलेल्या आईला मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माझ्या मुलीस शिवीगाळ का करतोस ? अशी विचारणा करण्यास गेलेल्या आईला मारहाण केलेची घटना तालुकयातील अजिवली -कातकरीवाडी येथे घडली आहे

श्रीमती मीरा मनोहर यादव ( वय -४२) यांच्या मुलीस आरोपी बाळू दत्या ( पूर्ण नाव माहित नाही ) याने तिला शिवीगाळ केल्याने याबाबत विचारणा करण्यासाठी मीरा यादव या गेल्या असता आरोपीने त्यांना लाकडी काठीने कपाळावर दोन भुवयाच्या मध्ये उपट मारून त्यांना गंभीर दुखापत केली तसेच शिवीगाळ केल्याने याबातचा गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आला आहे .

मे.सोनावणे सो.. यांचे कोर्टात

ॲड.राजकुमार व्ही. जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.५९८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०६/२०२२

कै.महादेव गंगाराम बेलोसे मयतचे वारस
श्रीमती.विमल महादेव बेलोसे
पुर्वाश्रमीची विमल गजानन पाटील
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.अंधार आळी गिरोबा मंदिर जवळ, रोहा,
ता.रोहा, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार ही कै.महादेव गंगाराम बेलोसे यांची पत्नी आहे. तसेच कै.महादेव गंगाराम बेलोसे यांची आई कै.दृपदा गंगाराम बेलोसे यांचे निधन मु.रोहा, ता.रोहा, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेले आहे. तसेच कै.महादेव गंगाराम बेलोसे यांचे निधन दि.१५/१२/२०१३ रोजी मु.रोहा, ता.रोहा, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला असून अर्जदार श्रीमती.विमल महादेव बेलोसे पुर्वाश्रमीची विमल गजानन पाटील ह्यांनी कै.महादेव गंगाराम बेलोसे यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नढाळ, ता.खालापूर, जि.रायगड**

| गावाचे नांव | स.नं./हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| नढाळ | १६५/१९१ | ०-०१-८५ | 0.00 |
| | १६५/१९४ | ०-०१-८५ | 0.00 |

अर्जदार या कै.महादेव गंगाराम बेलोसे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.महादेव गंगाराम बेलोसे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.४/०५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : नेरेपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत श्री.अरुण चंपालाल जैन, श्री.पद्माकर शशिकांत रोडपालकर, श्री.प्रमोद कुमार नंबियार तसेच श्री.लालु कुमार कुष्वाह, रा.पनवेल, जि.रायगड यांचेकडून आमचे अशिल जय हनुमान को.ऑप.हौ.सोसायटी, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड कायम खरेदीखताने विकत घेणार आहेत.

**मौजे : नेरेपाडा, ता.पनवेल, जि.रायगड**
**येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे**

| मौजे | गट व उपविभाग क्र. | भोगवटादार वर्ग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| नेरेपाडा | १४७/१ | १ | ०-३५-४०<br>पो.ख.०-०१-००<br>एकूण ०-३६-४० | ०.९१ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लीज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्तदावा, वारसाहक्क, लायसन्सी, लीन, टेनन्सी, वील, अन्नवस्त्र, पोटगी, ताबेकब्जा, हवाला, अदलाबदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत लेखी पुराव्यासह पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कुणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व मागाहून कोणत्याही स्वरुपाची हरकत घेतल्यास ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०६/०५/२०२२

**सही/-**
**ॲड.योगेश एन. केळकर**
**रा.६१९, बापटवाडा, टिळक रोड, रतन टॉकीज जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.क्र.९३२२८२७४०६**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल १) डॉ.अमरदिप कमलकिशोर कदम आणि २) डॉ.शिल्पा अमरदिप कदम, रा.फ्लॅट नं.ए-१००२, लॉर्डस्, प्लॉट नं.३५/३५ ए, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ हे श्रीमती.लता भाऊसाहेब शिंगाडे रा.ए/१३०३, बालाजी गार्डन, प्लॉट नं.१७, सेक्टर ११, कोपर खैरणे, नवी मुंबई ४००७०९ यांच्याकडून खालील मिळकत खरेदी करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**डुप्लेक्स फ्लॅट नं.१६०१-१७०१, १६ वा आणि १७ वा मजला, ईएल-कॅस्टिलो, प्लॉट नं.२३ बी आणि २३ सी, सेक्टर ६, नेरुळ, नवी मुंबई, ता.जि.ठाणे, फ्लॅटचे क्षेत्रफळ : ५२९१.५७ स्क्वे.फु., ४९१.५९ स्क्वे.मी. कारपेट एरिया**

वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही स्वरुपाची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०६/०५/२०२२
स्थळ : नवीन पनवेल

**सही/-**
**ॲड.पुनम ए. खरे**
**३, सत्यकृपा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.१०३, सेक्टर-९, न्यू पनवेल (पु), पिनकोड-४१०२०६**
**फोन नं.२७४६४५४८, मो.९८२०४०८४७२**

# अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या माफियांवर धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या माफियांवर आज पनवेल पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या निर्दे शानुसार पथकाने कारवाई करून चार बोटीसह इतर सामान जप्त केले आहे .

पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत रेती उत्खनन सुरू असून, याची गंभीर दखल घेत पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या निर्देशानुसार आज रोड पाली खाडीत धाड टाकून, रेती उत्खनन करून वाहून नेणाऱ्या दोन बार्ज आणि दोन बोटी तसेच सेक्शन पंप जप्त केले त्यात काही रेती ही जप्त करण्यात आली आहे, आतापर्यंत पनवेल तहसील कार्य क्षेत्रात दहा कारवाया करण्यात आल्या असून, नऊ गुन्हे दाखल करण्यात आले असून, आज केलेल्या कारवाईवर गुन्हा दाखल करून पुढे ही कारवाई अशीच सुरू राहणार असल्याचे कारवाई प्रमुख नायब तहसिलदार मांडे यांनी सांगितले.

# स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टीतर्फे राजर्षी शाहू महाराज स्मृति दिन संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या वतीने राजर्षी शाहू महाराज स्मृतिदिन त्यांच्या निवासस्थानी संपन्न झाला. यावेळी जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी आपल्या भाषणात सांगीतले. त्यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला व मृत्यू ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे झाला. शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानाचे महाराज होते. त्याचप्रमाण समाज सुधारक होते त्यांनी बहुजन समाजाला शिक्षीत करण्यासाठी शाळा व वसतीगृहे सुरु केली. स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निवारण, जातीभेद निर्मूलन, आंतरजातीय विवाह, विधवा विवाह असे घाडसी निर्णय त्यांनी घेतले, भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणासाठी व वर्तमानपत्र एकनायक यासाठी आर्थिक सहकार्य केले. अस्पृश्य समाजातील युवकांना व्यवसाय उभे करून दिले व आपल्या संस्थानात विविध पदावर नोकरी दिली. मागासवर्गीयांना नोकरीत आरक्षण शाहू महाराजांनी सुरु केले. त्यांनी २८ वर्ष कोल्हापूर संस्थाना कारभार सांभाळला.

मा.पांडे साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.राजेश श्रीधर पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रि.एम.ए.क्र.५३४/२०२२
ने.ता.१०/०६/२०२२

श्री.निलेश हरिश्चंद्र कोळी
वय : ३६ वर्षे, धंदा : मासेमारी
रा.कोंबडभुजे, पो.उलवे,ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत तरघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.हरिश्चंद्र अभिमन्यू कोळी यांचा मृत्यू दि.०५/०६/१९८८ रोजी मौजे : कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड येथे तरघर ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत झालेला आहे. अनावधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करणेची राहून गेली आहे. सब अर्जदार यंनी त्यांचे वडील कै.हरिश्चंद्र अभिमन्यू कोळी ह्यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता आदेश मिळणेबाबत पनवेल येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू कै.हरिश्चंद्र अभिमन्यू कोळी ह्या वर नमूद ठिकाणी मयत झालेले आहेत किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.६/०५/२०२२ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

मा.मुजावर साहेब कोर्ट

ॲड.प्रितम वास्कर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.६३६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०७/२०२२

१) श्री.रवींद्र लक्ष्मण कोळी
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.दयानंद लक्ष्मण कोळी
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.पौर्णिमा लक्ष्मण कोळी
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
४) श्रीमती.नर्मदाबाई लक्ष्मण कोळी
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.गणेशपुरी, पो.उलवा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ३ यांचे वडील व अर्जदार नं.४ चे पती कै.लक्ष्मण गणा कोळी हे दि.३/११/२०२१ रोजी मौजे : गणेशपुरी, पो.उलवा, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून त्यांना अर्जदार १ ते ४ असे सर्वजण त्यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.लक्ष्मण गणा कोळी यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| गाव/नोड | भूखंड क्रं. | सेक्टर क्रं. | क्षेत्र चौ.मी. | एफ.एस.आय. |
|---|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २७६ | २५ अे | ३३० | १.५ |

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै.लक्ष्मण गणा कोळी यांस गांवठाण विस्तार योजनेंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड कै.लक्ष्मण गणा कोळी यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यवयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.५/५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# स्वातंत्र्यसैनिक जगन्नाथ दाजी जाधव यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**



तालुक्यात जन्मलेले स्वातंत्र्यसैनिक जगन्नाथ दाजी जाधव यांचे दीर्घ आजार व वृध्दापकाळाने कुलाबा येथील मिलीटरी हॉस्पीटलमध्ये मंगळवार, दि.३ मे २०२२ रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी रात्री पोलादपूर येथे त्यांच्या जन्मगांवी अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलादपूर तहसिल कार्यालयामध्ये त्यांची स्वातंत्र्यसैनिक अशी नोंद नसल्याने प्रशासनाने शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होऊ शकले नाहीत. जगन्नाथ जाधव यांच्या कुटूंबियांनी त्यांचे अंत्यसंस्कार केल्याने याबाबत गेल्या चार दिवसात कोणासही माहिती नव्हती.

सातारा जिल्ह्यातील वाई गंगापूरी येथून पोलादपूरमध्ये आलेल्या जवारी या कुटूंबाचे पुढे आडनाव गोसावी आणि त्यानंतर जाधव म्हणून सर्वपरिचित झाले. यापैकी जगन्नाथ दाजी जाधव हे दाजी यांचे तिसरे अपत्य होते. सातवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर १९४५ साली ते सिंधूदूर्ग कणकवलीतील गोपूरी येथे आप्पासाहेब पटवर्धन यांच्याकडे काही काळ वास्तव्य केले. १९४७ मध्ये भारतीय स्वातंत्र्यानंतर हैद्राबाद मुक्ती संग्राम ऐन संघर्षाच्या पावित्र्यात आला असताना जगन्नाथ जाधव यांनी सातत्याने सर्व भूमिगतांना सहकार्याची भूमिका घेतली. हैद्राबादच्या स्वातंत्र्यानंतर त्यांना वॉरन्ट सर्टीफिकेट जारी करण्यात आले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरून नाथ संप्रदाय, नवनाथ संप्रदाय, नाथ जागी, फासेपारधी अशा सर्व भटक्या समाजाला एकत्र करण्याचे काम सुरू केले. हरिजन, गिरीजन, कातकरी, कैकाडी, कोल्हाटी, गोसावी, जवारी, डौरी, बाबा, बेलदार आणि सर्व भटका समाज एकत्र करण्यात काहिसे यश आल्यानंतर दिल्ली येथे अखिल भारतीय मागास परिषदेचे अध्यक्ष काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखालील परिषदेस जगन्नाथ दा. जाधव यांनी प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रातून पाठविण्यात आले. जगन्नाथ जाधव यांना त्यांच्या देशसेवेबद्दल स्वातंत्र्यसैनिक पुरस्कार तर सामाजिक कार्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांनी जस्टीस ऑफ पीस (जेपी) पदवी देऊन सन्मानित केले. त्यांनी थोर समाजसेविका डॉ. उषा मेहता यांचे सचिव म्हणून जबाबदारी स्विकारली. त्यांच्या अखेरपर्यंत सोबत करताना शिक्षण, समाजजागृती, बालवाड्या, स्त्रीमुक्ती चळवळ, व्यसनमुक्ती, अपंग संस्था, महिला संस्था, अनाथ संस्थांसाठी महत्वपूर्ण योगदानही दिले.

महाराष्ट्राबाहेर हैद्राबादपर्यत देशसेवा केल्यानंतर समाजसेवेचे व्रतही दिल्ली, मेरठ,मडगांव-गोवा येथेवर पोहोचविले. याकाळात महाराष्ट्र राज्य हरिजन वेल्फ` अर अॅडव्हायजरी बोर्ड सल्लागार सदस्य, नेताजी सुभाषचंद्र बोस पुरस्कार- उत्त-रप्रदेश मेरठ, बृहन्मुंबईमध्ये विशेष कार्यकारी दंडाधिकारी, आझादी एक्सप्रेस रेल पुरस्कार, विजिलन्स कमिटी मुंबई सदस्य, महाराष्ट्र राज्य प्रांतिक काँग्रेस कमिटी जनरल सेक्रटरी अशी अनेक पदे भूषविली. डॉ.उषा मेहता यांच्यासमवेत राष्ट्रीय नेत्यांच्या संपर्कात येण्याची संधी त्यांना लाभली. जगन्नाथ दाजी जाधव वृध्दापकाळात पोलादपूर तालुक्यात गेली वीस वर्षे वास्तव्यास राहिले.

पोलादपूर तालुक्यात जगन्नाथ दाजी जाधव यांना जेपी जाधव या नावाने ओळखले जात असले तरी प्रशासनाला त्यांचे नांव पोलादपूर तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक म्हणून ज्ञात नसल्याने त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले नाही. त्यांच्या कुटूंबियांनी त्यांचे उत्तरकार्य रविवार, दि.१५ मे २०२२ रोजी आयोजित केले आहे.

# माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणुक लवकरच व्हावी नागरिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरन यांच्या आदेशाने सहकारी संस्थांच्या निवडणुकीच्या तारखा लवकरच जाहीर होणार आहेत.यासाठी माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेची एकूण १२३५ सभासदांची अशी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली असून तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कडे ती पाठविण्यात आली आहे.

एकूण १३ संचालक उमेदवार असलेल्या माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेची एकूण १२३५ सभासदांची अंतिम यादी तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कडे पाठविण्यात आली आहे.दि१९ एप्रिल ते २७ एप्रिल सायंकाळी ५ वाजे पर्यंत सदर प्राथमिक मतदार यादीवर आक्षेप व हरकती मागविण्यात आल्या होत्या.परंतु सदर कालावधीत संस्थेच्या कार्यालयात सभासदांच्या मतदार यादीवर कोणतेही आक्षेप व हरकती प्राप्त झाल्या नाहीत. त्यामुळे तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे एकूण १२३५ सभासदांची अंतिम यादी पाठविण्यात आलेली आहे.हीच अंतिम मतदार यादी ग्राह्य धरली जाणार आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाच्या आदेशानुसार लवकरच माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेचा उर्वरित निवडणुक कार्यक्रम जाहीर केला जाईल.याची सर्व मतदार भागधारकांनी नोंद घ्यावी.तसेच मतदार सभासदांच्या माहिती करीता सदर अंतिम यादी संस्थेच्या नोटीस फलकावर उपलब्ध आहे.आणि येथील कोणत्याही सभासदाला ही मतदार यादी हवी असल्यास काही शुल्क आकारणी करून देण्यात येणार आहे.आत्ता लवकरच माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक तारीख जाहीर होणार अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे.आणि पतसंस्थेच्या निवडणुकीतच प्रत्येक पक्षाला आपली ताकद कळते यावेळी पतसंस्थेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण व्हावी अशी समस्त सभासद, ठेवीदार, ग्राहक, भागभांडवलदार आणि हितचिंतक यांची मागणी होत आहे.

# पनवेल हेड पोस्ट ऑफिस सकाळी ८ ते रात्री ८ नागरिकांच्या सेवेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**



भारतीय डाक विभागाच्या नागरिक केंद्रित दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून आणि ग्राहकांच्या सोईसाठी नवी मुंबई पोस्टल रीजनने निवडक पोस्ट ऑफिस मधे विशेष काऊंटर द्वारे सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत सर्व मेल आणि बँकिंग सेवा प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पनवेल मुख्य डाकघर येथे दिनांक ०५ मे २०२२ पासून सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत मेल व बँकीग सेवा देण्यासाठी विशेष काऊंटर सुरू करण्यात आले आहे.

या विस्तारित काउंटर वेळेचा उपयोग ग्राहकांना कार्यालयीन वेळेनंतर मेल पोस्ट करण्यासाठी देखील होईल. सध्याच्या कर्मचार्यांच्या कार्यालयीन वेळा समायोजित करून हे व्यवस्थापन केले जात आहे. पनवेल हेड पोस्ट ऑफिस प्रमाणेच ठाणे, कल्याण, मीरा रोड आणि प्रदेशातील इतर काही टपाल कार्यालये सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत सेवा येणा-या कालावधीत प्रदान करणार आहेत.

शहरातील जे नागरिक कामाच्या निमित्ताने सकाळी लवकर निघतात आणि उशिरा घरी परततात, विशेषत: नवी मुंबई आणि ठाणे- कल्याण येथे राहणारे पण कामासाठी मुंबई शहरात प्रवास करणाऱ्या नोकरदार वर्गास याचा निश्चितच फायदा होईल अशी अपेक्षा नवी मुंबई क्षेत्रातील पोस्ट मास्तर जनरल गणेश व्ही. सावळेश्वरकर यांनी बोलताना व्यक्त केली.

# १५ रोजी चणेरा येथे भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संलग्न रोहे तालुका चणेरा विभाग कुणबी समाजाचे वतीने ता.१५ मे रोजी भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

चणेरा कुणबी समाजाचे अम्रुत महोत्सवी वर्षानिमित्त सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या निमित्ताने श्री. सत्यनारायणाची महापूजाही आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यक्रमातंर्गत स.९ ते ११ श्री.सत्यनारायणाची महापूजा,दु.१२ ते २ महाप्रसाद,२:३० ते ४:३० हळदीकुंकू समारंभ,४:३० ते ५:३० मान्यवरांचा सन्मान सोहळा तद्नंतर भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रथम क्र.रू.३३०००/-व आकर्षक चषक ,द्वितीय क्र.रू.२२०००/-व आकर्षक चषक,तर तुतीय व चतुर्थ क्र.रु.११०००/-व आकर्षक चषक तसेच सर्वोत्कृष्ट खेळाडू रू.३०००/- व ट्रॉंफी,उत्कृष्ट पक्कड व उत्कृष्ट चढाई रू.२०००/- व ट्रॉंफी तसेच पब्लिक हिरो रू.२०००/- व ट्रॉंफी आदी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

तर स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी काशिनाथ भोईर ९४२११६०५६९ व संतोष देवळे ९२७१९०७५०८ यांच्याशी संपर्क साधण्याचे अवाहन करण्यात आले आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी अध्यक्ष नरेंद्र सकपाल,उपाध्यक्ष बबन पडवळ,सचिव काशिनाथ पडवळ,धर्मा शिगवण,बाळकृष्ण पवार,कमलाकर शिंगाडे तसेच समाजाचे आजी माजी पदाधिकारी, सदस्य,समाज बांधव व मुंबई मंडळ अधिक मेहनत घेत आहेत


Hon'ble Mujwar Court
Adv. Pravin P. Pisal
Applicant Advocate

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION, AT PANVEL

Civil M A No.788 of 2022
Exh No. 8/D
Next Date : 27/06/2022

1) Mrs.Tamanpreet Venkatesh
Aged 49 year, Occupation : House wife
2) Miss.Shriya Venkatesh
Aged 14 year, Occupation : Student
Applicant No.2 Through her
Natural Guardian Applicant No.1 Mother
Applicant No.1 & 2 Residing at : Flat No. 501, Tower No.5, The Springs, Plot No.4 Sector-20, Road Pali, Kalamboli, Taloja Road, Kalamboli Node, Tal-Panvel, Dist-Raigad — Applicant

V/s

None — Respondent

All the public is informed by this notice inform that, Late. Venkatesh Krishanan died on 09/04/2022 At. Doha-Qatar and Mrs.Tamanpreet Venkatesh & Others application for Heirship below Property of Late. Venkatesh Krishanan

**Flat No.501 in 'E' Wing On the 5 th Floor, Tower No.5, The Springs, Plot No.4, Sector-20, Roadpali Taloja Road, Kalamboli, Navi Mumbai having Carpet area 1362 sq.ft. + 321 sq. ft. & fb, Tal-Panvel, Dist-Raigad-410218, Market Value 1,18,00,000/-**

The above mention Property was owned by Late. Venkatesh Krishanan, Mrs.Tamanpreet Venkatesh & Others are legal heirs of Late.Venkatesh Krishanan. If any person has any objection to their rights in the above said property, he/she must appear with the quota within one month. If appropriate objection is not taken during this time. The court will take immediate action to obtain evidence for Mrs.Tamanpreet Venkatesh & Others rights, and if they prove that they are entitled as legal Heirs of Late.Venkatesh Krishanan, the heirship certificate shall be issued in favour of Applicants.

Date 06/05/2022 On the day I gave my sign and court stamp.

Sd/-
Jr.Clerk
Hon Court S.D.
Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superitent.
Hon Court S.D.
Panvel



Hon'ble Mujwar Court
Applicant Advocate : Shri.Rajiv Kumar Gupta

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) PANVEL AT PANVEL

Civil M.A. No.704/2022
Exh No. 8/D
Next Date : 12/07/2022

1) MRS.DILPREET KAUR CHADHA
Age : 27 Yrs, Occupation : Houswife
Residing at : Permanent Address : Regency Bldg, Rustomjee Complex, Flat No.2C/1303, Rustomjee Irani Marg. J.S.Road, Dahisar West Dahisar, Mumbai-400068
Temporary Address : Siddhivinayak Tower, Flat No.702, Plot No.82, Dreamland Building, Sector-19, Kamothe, Navi Mumbai-410209 — Applicants

V/S

1) MRS.DILPREET KAUR CHADHA,
Age : 62 Yrs, Occupation : Houswife
Residing at : Siddhivinayak Tower, Flat No.702, Plot No.82, Dreamland Building, Sector-19, Kamothe, Navi Mumbai-410209 — Defendants

WHEREAS the above named Applicants have filed the application for Succession Certificate of deceased LATE.HARVINDER SINGH, who died on 26/07/2021, on at Dubai (UAE). in respect of her share in the properly mentioned herein under in schedule standing in the name of Deceased as co-sharer / holder with others which described as under:

**SCHEDULE OF PROPERTY**

**A/A Singapore Private Limited's Group Term Life and Group Hospitalization and Surgical policy and A/G Asia Pacific Insurance Pte. Ltd's Group Business Travel policy a sum of 5GD 404, 724.45 (Sum) (INR. 2 Crore Approx)**

WHEREAS if any person has any objections, Titles, Claims, Share etc. in the property herein under mentioned then they may appear in person or through their Advocates, objecting this application, If no one appears and objects for the same within 30 days days from the date of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary order thereon.

Given under my hand and seal of this Court on this 6/05/2022

Sd/-
Jr.Clerk
Civil Court Panvel
S.D.

Court Seal

Sd/-
Asst.Superitent.
Civil Court Panvel
S.D.



मा.मुजावर साहेब ह्यांचे न्यायालयात

वारसांचे सर्टीफिकेटबद्दल जाहीरनामा — दिवाणी अ.१५० रा.
प्रोसेस जमा रु.५०/- — Civ. A 150 m

ॲड.सुनिता प्रभू
अर्जदार यांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयात पनवेल

दि.चौ.अर्ज क्रं.५९६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०७/२०२२

श्री.अक्षय आत्माराम परब
वय : ३२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.डोंबिवली — अर्जदार

विरुद्ध

श्री.आत्माराम गणपत परब व इतर — सामनेवाला

वरील अर्जदार यांचे आई कै.अस्मिता आत्माराम परब यांचे दि.०३/१२/२०२१ रोजी करंजाडे येथे निधन झाले. मयत कै.अस्मिता आत्माराम परब यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन असलेली मिळकत ही कै.अस्मिता आत्माराम परब यांचे नावे होती.**

**२०३, सर्वोदय आंगण, प्लाट ३२, सेक्टर ४, करंजाडे**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्यही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.६/०५/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मे.सोनावणे सा़ो. यांचे कोर्टात

ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.७३०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१४/०६/२०२२

कै.उर्मिला स्वामिनाथ गुप्ता मयतचे वारस
१) श्री.स्वामिनाथ चुन्नीलाल गुप्ता
वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.सचिन स्वामिनाथ गुप्ता
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
वरील १ व २, रा.पी एल-६/८, रुम नं.७, अभ्युदय बँकेजवळ, सेक्टर १७, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.रवींद्र स्वामिनाथ गुप्ता
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.४०१, बिल्डींग नं.११, निलसिद्धी अमरंते, प्लॉट एन ४, सेक्टर ९ ई, डी मार्ट, रोडपाली, पनवेल, कळंबोली नोड, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.कविता रविकांत गुप्ता
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.सी-७, प्रगती सी एच एस, पुजा लिंक रोड, सेंट थॉमस हायस्कूलजवळ, विजय नगर, कल्याण ईस्ट, कल्याण काटेमानीवळी, ठाणे, कल्याण, महाराष्ट्र — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.उर्मिला स्वामिनाथ गुप्ता यांचे दि.१५/०४/२०२१ रोजी सुश्रृत हॉस्पिटल, रोडपाली येथे निधन झाले असून श्री.स्वामिनाथ चुन्नीलाल गुप्ता, वगैरे ह्यांनी कै.उर्मिला स्वामिनाथ गुप्ता यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पी एल ६, बि.नं.८, रुम नं.७,**
**सेक्टर १७, नवीन पनवेल (ईस्ट),**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**पैकी कै.उर्मिला स्वामिनाथ गुप्ता अर्ध्या क्षेत्राकरिता**
**सदर सदनिकेची एकूण किंमत रु.४,५०,०००/-**
**त्यापैकी ५० टक्के हिश्श्याची रक्कम रु.२,२५,०००/-**
**(अक्षरी रक्कम रुपये दोन लाख पंचवीस हजार मात्र)**

वरील मिळकत ही कै.उर्मिला स्वामिनाथ गुप्ता यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्री.स्वामिनाथ चुन्नीलाल गुप्ता, वगैरे हे कै.उर्मिला स्वामिनाथ गुप्ता यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या सल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.स्वामिनाथ चुन्नीलाल गुप्ता, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.उर्मिला स्वामिनाथ गुप्ता यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०६/०५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.७४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०७/२०२२

(कै.शिणूबाई उर्फ शिनुबाई उर्फ सिनुबाई उर्फ सोमुबाई उर्फ सोनुबाई दशरथ तांडेल यांचे कायदेशीर वारस)
१) श्री.मनोहर दशरथ तांडेल (मुलगा)
वय : ५५, धंदा : नोकरी
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड
२) श्री.भाऊ दशरथ तांडेल (मुलगा)
वय : ५६, धंदा : नोकरी
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायड
३) श्री.प्रभाकर दशरथ तांडेल (मुलगा)
वय : ५३, धंदा : नोकरी
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड
४) सौ.सविता धनंजय म्हात्रे (मुलगी)
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मुळेखंड, तेलीपाडा, ता.उरण, जि.रायगड
५) सौ.रेवती उर्फ रेवतबाई हिरामण कडू (मुलगी)
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रांजणपाडा, ता.उरण, जि.रायगड
६) कै.दामोदर दशरथ तांडेल (मयत मुलगा) तर्फे वारस
६/१) श्री.पंकज दामोदर तांडेल (मुलगा)
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड
६/२) श्रीमती.प्रमिला दामोदर तांडेल (पत्नी)
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड
६/३) सौ.प्रिती महेंद्र ठाकूर (मुलगी)
उर्फ प्रिती दामोदर तांडेल (लग्नाआधीचे नाव)
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.खोपटे, ता.उरण, जि.रायगड
६/४) सौ.प्रतिक्षा ज्ञानेश्वर पाटील (मुलगी)
उर्फ प्रतिक्षा दामोदर तांडेल (लग्नाआधीचे नाव)
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रावे, ता.पेण, जि.रायगड
६/५) सौ.प्रगती सुहास म्हात्रे उर्फ प्रगती दामोदर तांडेल (मुलगी)
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड
७) कै.राजाराम दशरथ तांडेल (मयत मुलगा) तर्फे वारस
७/१) श्री.नरेंद्र राजाराम तांडेल (मुलगा)
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड
७/२) श्री.सर्वेश राजाराम तांडेल (मुलगा)
वय : ३१ वर्षे, धंदा : शेती
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड
७/३) श्रीमती.कलावती राजाराम तांडेल (पत्नी)
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पागोटे, ता.उरण, जि.रायगड
७/४) सौ.अक्षदा उर्फ आकांक्षा अशोक म्हात्रे
वय : ३२ वर्षे, धंदा : शेती
रा.मुळेखंड, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन

**अ) मौजे : करळ, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | करळ | ५८ | ९ | ००-०८-६ | ४२० + ४२१ |
| २ | करळ | ४९ | १७ | ००-०५-१२ | ४२० + ४२१ |
| ३ | करळ | ५७ | ५ | ००-०७-४ | ४२० + ४२१ |
| ४ | करळ | ५८ | ८ | ००-०३-४ | ४२० + ४२१ |
| ५ | करळ | ५८ | १२ | ००-०७-१२ | ४२० + ४२१ |
| ६ | करळ | ५८ | १९ | ००-०७-८ | ४२० + ४२१ |
| ७ | करळ | १०० | ३ अ | ००-०५-१२ | ४२० + ४२१ |
| ८ | करळ | १६१ | ७ | ००-०९-०० | ४२० + ४२१ |

**मिळकतीचे वर्णन**

**ब) मौजे : करळ, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | करळ | १८ | १० | ००-०४-० | ५११/६० |
| २ | करळ | १७८ | १ | ००-०३-४ | ५११/६० |

**मिळकतीचे वर्णन**

**क) मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनारी | १२ | ३ | ००-१४-० | ८८/१६ |

**मिळकतीचे वर्णन**

**ड) मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनारी | १ | ५ | ००-२-१२ | १२५/८५ |
| २ | सोनारी | १ | १० | ००-११-८ | १२५/८५ |
| ३ | सोनारी | २ | ४ | ००-०७-० | १२५/८५ |
| ४ | सोनारी | ३ | ४ | ००-०७-१२ | १२५/८५ |
| ५ | सोनारी | ३ | ९ | ००-१-० | १२५/८५ |
| ६ | सोनारी | ३ | १३ | ००-०६-८ | १२५/८५ |
| ७ | सोनारी | ५ | २ अ | ००-०५-०० | १२५/८५ |
| ८ | सोनारी | १७ | १४ | ००-१-८ | १२५/८५ |
| ९ | सोनारी | १८ | ६ | ००-१३-०० | १२५/८५ |
| १० | सोनारी | २३ | ६ | ००-०२-०० | १२५/८५ |
| ११ | सोनारी | २८ | ५ | ००-०४-८ | १२५/८५ |
| १२ | सोनारी | २९ | २ | ००-०२-० | १२५/८५ |
| १३ | सोनारी | ३० | ३ | ००-०१-१२ | १२५/८५ |
| १४ | सोनारी | ३१ | २ | ००-०३-४ | १२५/८५ |
| १५ | सोनारी | ३१ | ६ | ००-१३-०० | १२५/८५ |

**मिळकतीचे वर्णन**

**इ) मौजे : करळ, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | करळ | ५४ | ४ | ००-०१-४ | ३९९ |

येणेप्रमाणे मिळकतींचे वर्णन आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.शिणुबाई उर्फ शिनुबाई उर्फ सिनुबाई उर्फ सोनुबाई उर्फ सोनुबाई दशरथ तांडेल यांचे कायदेशीर वारस यांच्या हिश्श्यात अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : उरण
दिनांक : ०६/०५/२०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

# संक्षिप्त...

## केगावचे माजी सरपंच अशोक पाटील यांचे निधन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अशोक पाटील (६७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.ते केगाव ग्रामपंचायतींमध्ये १९७७ ते २०१५ दरम्यान सहावेळा सदस्य म्हणून निवडून आले होते.त्यांनी या दरम्यान उपसरपंच पदाचा धुराही सांभाळली आहे.त्यांच्या ३६ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत अनेक सामाजिक कामे करुन गावाचा विकास केला. त्यांचे मुंबईतील रुग्णालयात अकस्मित निधन झाले.त्यांच्यावर केगाव-दांडा येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.याप्रसंगी उरणचे आ. महेश बालदी,केगाव आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य विविध राजकीय पक्षांचे नेते, पुढारी सहभागी झाले होते.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

## अज्ञात चौकडीने ट्रेलरसह टेंम्पो चालकांना लाखो रुपयांना लुटले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात चौकडीने ट्रेलरसह टेंम्पो चालकांना लाखो रुपयांना लुटल्याची घटना पनवेल परिसरात घडल्याने वाहन चालकांमध्ये भीतीयुक्त वातावरण आहे. दऱ्याप्पा घुंबरे (वय २७ ) हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर पुणे - मुंबई एक्स्प्रेस वे रोड च्या पनवेल एक्झीट जवळ मुंबई लेन वरील ९. ६०० कि. मी . रोड च्या कडेला थांबून तो लघुशंके साठी गेला असता चार अज्ञात इसमानी तेथे येऊन त्याला मारहाण करून मारण्याची धमकी देऊन त्याच्या कडील रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकूण ५३. ३०० रुपये किमतीचा ऐवज लुटल्याची घटना घडली आहे .तर दुसऱ्या घटनेत नागराज मराठ ( वय ३३ ) हा त्याच्या ताब्यातील टेम्पो घेऊन मुंबई -पुणे एक्स्प्रेस वे रोड ने पुणे लेन ने घेऊन जाऊन पळस्पे टॅप पोलीस चौकी जवळील अंदाजे ९. ८०० कि. मी. जवळ आल्यावर रस्त्याच्या बाजूला आपला टेंम्पो उभा करून तो लघुशंके साठी गेला असता अज्ञात चार इसमाने तेथे येऊन त्याला धमकावून त्याच्या पॅन्ट च्या खिशातील ६६. ४०० रुपये काढून घेऊन ते पळून गेल्याने याबाबत ची तक्रारी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आल्या आहेत .


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# बेरोजगारांसाठी व्यवसाय आणि अर्थसहाय्य मार्गदर्शन शिबीर

## प्रितम म्हात्रे यांच्या जे. एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना काळात बऱ्याच नागरीकांच्या नोकऱ्या गेल्या व्यवसाय ठप्प झाले अशा परिस्थितीतही गेल्या पाच ते सहा महिन्यापासून स्वतःला सा-वरत प्रत्येक नागरीक पुन्हा उभा राहण्याचा प्रयत्न करत आहे.

अशा परिस्थितीत आपणही काहीतरी करायला पाहिजे या उद्देशाने जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था आणि लक्ष्यपूर्ती वेलफेअर फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ८ मे २०२२ रोजी सकाळी दहा वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे व्यवसाय आणि अर्थसहाय्य मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये केंद्र शासनाच्या अंतर्गत येणाऱ्या खादी आणि ग्रामोद्योग आयोगच्या माध्यमातून जे कोर्सेस आहेत त्यांपैकी काही ठराविक कोर्सेसची विस्तृतपणे माहिती त्या विभागातील अधिकाऱ्यांच्या मार्फत मिळणार आहे. ते कोर्स झाल्यानंतर आपल्या व्यापाराला चालना देण्यासाठी राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ आणि इंडियन चेंबर ऑफ इंटरनॅशनल बिझनेसच्या तज्ञ मंडळींकडून आपल्याला मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच यावेळी केंद्र आणि राज्य शासनाच्या सबसिडी कर्जपुरवठा करते वेळी बँकांचे काही नियम असतात त्या नियमांविषयी आपल्याला सहकार्य करण्यासाठीबँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकचे अधिकारी उपस्थित राहणार आहे. जेणेकरून आपल्याला नव्याने सुरू करणारा व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध होण्यास सहज सोपे होईल.



सध्याच्या काळात नागरिकांमध्ये स्कीन आणि हेअर ट्रीटमेंट संदर्भात जागृतता झाली आहे. सध्या या क्षेत्रात बरीच रोजगाराची संधी आहे. त्यासाठी त्याला अनुसरून जे विविध प्रकारचे कोर्सेस आहेत त्या कोर्सेसची माहिती आणि सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी तंत्राज हेल्थ अँड ब्युटी वेलनेस क्लिनिक च्या डॉ.पल्लवी संदीप शिंदे मार्गदर्शन करणार आहेत. कोणताही व्यवसायाचा अनुभव नसताना आज वर्षाला पन्नास लाख एक करोड पर्यंतचा व्यवसाय नेणाऱ्या पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील काही महिला उद्योजिकांचा सन्मान आणि त्यांचे मनोगत ऐकण्याची संधी या कार्यक्रमांमध्ये उपलब्ध होणार

पनवेलमध्ये प्रथमच एका छत्राखाली केंद्र सरकारचे विविध कोर्सेस ची माहिती देण्यासाठी संबंधित विभागातील अधिकारी येणार आहेत. तसेच कोर्स पूर्ण झाल्यावर आवश्यक ते परवाने काढण्यासाठी सहकार्य सुद्धा आम्ही देणार आहोत. कोर्स करून परवाने काढल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार मार्फत ज्या विविध सबसिडी कर्ज पुरवठा वरती देण्यात येतात त्या मिळण्यासाठी योग्य मार्गदर्शन करण्यासाठी विविध नॅशनलाईज बँकांचे प्रतिनिधी सुद्धा येणार आहेत. हे शिबिर युवक, महिला आणि तृतीयपंथी अशा प्रत्येक स्तरातील नागरिकांसाठी मोफत आयोजित करण्यात आलेले आहे.

**- प्रितम जनार्दन म्हात्रे, अध्यक्ष**
**जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था**

## मुरुड-तळा-पुणा-मुरुड बस सुरू करण्याची तळा तालुका पत्रकार संघटनेची मागणी

**दै.रायगड नगरी । तळा**

कोकणातील सर्व सामान्यांची जनतेचीएकमेव लालपरीअर्थातएस.टी. दळणवळणाचे एकमेव साधन असून तळा-पुणा नियमित चालणारी गाडी बंद केल्याने प्रवासीवर्गाचे मोठे हाल झाले आहेत सदर बसला तळा इंदापूर माणगांव मधून मोठ्या प्रमाणावर प्रवासी मिळत होते. घाट माथ्यावर जाणारे मोठा प्रवासी वर्ग असून जाण्यासाठी एकमेव गाडी असल्याने प्रवासी वर्गाला मोठा आधार होता. तसेच शाळा काँलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना गाडीचा लाभ होत होता.



कोरोना काळात लाँकडाऊन असल्याने गाडी बंद होती. लाँकडाऊन उठवून जनजीवन पुर्ववत होत असताना काही काळा साठी गाडी सुरु केली होती पण थोड्या फार प्रमाणात प्रवासी संख्या मंदावली आहे. हे वास्तव असू शकते परंतु भारनियमन कमी येत असल्याचे कारण पुढे करून गाडी बंद केली आहे अशी माहिती अधीकृतअधिकारी रोहाआगारातून प्राप्त झाली आहे. तळा तालुका ठिकाण मध्यवर्ती असुन शासकीय कामासाठी मुरुड तळा मार्गावर अनेक गावातील प्रवाशांना लाभ मिळू शकतो. तसेच मांदाड (राजपूरी) खाडीवर स्व.बॅ.अंतुले यांच्या संकल्पनेतून मुरुड रोहा तळा दळणवळणासाठी सुरु केला असून या मार्गावर एकही गाडी नसल्याने मोठी गैरसोय होत आहेत. घाट माथ्यावरून अनेक पर्यटक निसर्ग प्रेमी यांना लाभ मिळेल तसेच मुरुड-तळा तालुक्यात अनेक विविध खात्यात कर्मचारी वर्ग आहे.

मुरुड तालुक्यातील व ग्रामीण या भागातील प्रवाशांना लाभ मिळत नसल्याने पर्यटक नाराजी व्यक्त करीत आहेत. तरी मुरुड-तळा -पुणा- मुरुड आगारातून पुर्वीच्या वेळेत सुरु करावी. जेणे करून मुरुड तळा माणगांव स्वारगेट पुणा जाणाऱ्या प्रवाशांना लाभ होईल व महामंडळाला अधिक उत्पन्न वाढेल. तरी विभागीय कार्यालयाने त्वरीत लक्ष घालून मुरुड तळा पुणा मुरुड गाडी नव्याने सूरू करावी अशी मागणी तळा प्रेस क्लबने केली असून प्रवाशांकडून जोर धरू लागली आहे.

## कळंबोलीतील विकास कामे लवकरच मार्गी लागणार : गणेश देशमुख

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी कळंबोली प्रभाग क्र.१० येथे नगरसेवक रवींद्र अनंत भगत यांच्या विनंतीला मान देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी पाहणी दौरा केला. त्यावेळेस नागरिकांनी आयुक्त साहेबांचं पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. त्यानंतर कळंबोलीतील विकास कामाबाबत पाहनी करण्यासाठी सुरुवात केली.

सेक्टर १ ई येथील अवाढव्य नाला काही ठिकाणी बंद करण्याचे आश्वासन दिले. तसेच नाल्यातील कचरा घाण हा पावसाळ्यापूर्वी तात्काळ काढण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले. तसेच कळंबोली छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण हे मिनी स्टेडियम बनवण्यासाठी सिडको सोबत चर्चा करुन तात्काळ मिनी स्टेडियम बनवण्याचे आश्वासन देण्यात आले. त्याच बरोबर कळंबोली मधील होल्डिंग पाँड सुशोभीकरण करुन



जनतेसाठी ऑकिंग ट्रॅक लवकरात लवकर तयार करण्यात येईल असे आश्वासन दिलं आहे.

कळंबोली कारमेल शाळ-लगत असलेला नाला सुद्धा काही प्रमाणात बंदिस्त करण्यात येतील आणि नाला पावसाळ्यापूर्वी तात्काळ साफ करण्यात येतील. त्याच प्रमाणे कळंबोली सेक्टर २ व २ई मधील गार्डन सुशोभीकरण करुन त्याठिकाणी लहान मुलांच्या खेळण्यासाठी लागणारे साहित्य (डेव्हलपमेंट) करण्यात येईल. आजच्या आयुक्तांच्या दौऱ्यामध्ये अनेक विषय येत्या १ ते २ महिन्यात अति तात्काळ कामे पूर्ण होतील असे आश्वासन देण्यात आले आहे.

यावेळी नगरसेवक गोपाळ भगत, कळंबोली गाव महिला मंडळ, कार्यकर्ते,महिला कार्यकर्त्या, कळंबोली मधील नागरिक उपस्थित होते.

## नैना प्रकल्पाच्या प्रारुप नगर रचनाविषयी जमीन मालकांनी सूचना व हरकती नोंदविण्याचे सिडकोचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नैना प्रकल्पाकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नैना प्रकल्पातील २३ गावांच्या मंजूर करण्यात आलेल्या अंतरिम विकास आराखड्याची अंमलबजावणी सिडकोतर्फे करण्यात येत आहे. त्यानुसार प्रारुप नगर रचना परियोजना क्र. ४, ५, ६ आणि ७ तयार करण्याचा इरादा महाराष्ट्र शासन राजपत्रासोबतच स्थानिक वर्तमानपत्रांतदेखील जाहीर करण्यात आला होता. सदर प्रारुप योजनांविषयी काही सूचना व हरकती असल्यास, जमीन मालकांनी सिडकोच्या नैना कार्यालयात सादर करण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे.

या प्रस्तावाचा भाग म्हणून प्रारुप नगर रचना परियोजना क्र. १, २ आणि ३ ला शासनाने मंजुरी दिली आहे. प्रारुप नगर रचना परियोजना क्र. ४, ५, ६ आणि ७ तयार करण्याचा इरादा अनुक्रमे दिनांक २१.०६.२०१९, २६.०६.२०१९, ०८.०८.२०१९ व १८.०९.२०१९ रोजी जाहीर करण्यात आला होता. सदर योजना प्रसिद्ध करण्यासंबंधीची सूचना दि. २५.०४.२०२२ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच स्थानिक वृत्तपत्रांमध्येही याबाबतची सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या परियोजनांचे सविस्तर नकाशे, अहवाल आणि नियमावली फॉर्म क्र. १ व २ जमीन मालकांना पाहण्याकरिता नैना कार्यालय, ७वा मजला, टॉवर क्र. १०, सीबीडी बेलापूर रेल्वे स्थानक संकुल तसेच सिडकोच्या www.cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

सिडकोच्या संकेतस्थळावर परियोजनांचा तपशील हा पुढील अनुक्रमांकां (अ.क्र.) पुढे उपलब्ध आहे. प्रारुप परीयोजना क्रमांक-४ सिडकोच्या संकेत स्थळावरील नैना येथील मराठी अनुक्रमांक ९१ वर असून इंग्रजी अनुक्रमांक ९३ वर उपलब्ध आहे. प्रारुप परीयोजना क्रमांक-५ सिडकोच्या संकेत स्थळा-वरील नैना येथील मराठी अनुक्रमांक ९२ वर असून इंग्रजी अनुक्रमांक ९४ वर उपलब्ध आहे. प्रारुप परीयोजना क्रमांक-६ सिडकोच्या संकेत स्थळावरील नैना येथील मराठी अनुक्रमांक ९३ वर असून इंग्रजी अनुक्रमांक ९५ वर उपलब्ध आहे. प्रारुप परीयोजना क्रमांक-७ सिडकोच्या संकेत स्थळावरील नैना येथील मराठी अनुक्रमांक ९४ वर असून इंग्रजी अनुक्रमांक ९६ वर उपलब्ध आहे.

सदर सुचना स्थानिक वृत्तपत्रात सुध्दा प्रसिध्द करण्यात आल्या आ-हेत. तरी संबंधित जमीन मालकांनी मूळ जमिनीचा आकार व त्यांना देऊ करण्यात आलेले अंतिम भूखंडाचे क्षेत्र यांमध्ये काही तफावत आढळल्यास, तसेच उपरोक्त प्रारुप योजनांविषयी काही सूचना व हरकती असल्यास, प्रारुप योजना प्रसिद्ध करण्यासंबंधीची सूचना वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सिडकोच्या नैना कार्यालयात ७/१२ आणि गटबुकासह सादर करावयात, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे. ग्राह्य सूचनांच्या अनुषंगाने उपरोक्त प्रारुप परियोजना राज्य शासनाच्या मंजुरीस्तव सादर करण्यात येणार आहेत.

## संपामुळे ठप्प झालेली एसटीची प्रवासी सेवा रुळावर येत असताना एसटीच्या प्रगतीला बीएसएनएलचा होत आहे अडसर

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

संपामुळे ठप्प झालेली एसटीची प्रवासी सेवा आता हळूहळू रुळावर येत आहे. रायगड विभागांत बहुतांश कर्मचारी कर्तव्यावर हजर झाले असून, गाव तिथे एसटी दिसायला लागली आहे. एसटीच्या प्रतीक्षेत असलेल्या गावा- गावा-तील नागरिकांनीही सेवेला चांगला प्रतिसाद दिला असून सध्या जिल्ह्यातील आठही डेपोंतून एसटीच्या बसेस पुन्हा धावू लागल्या आहेत. प्रवासी वाढल्याने जिल्हाचे एस.टी. चे उत्पन्नातही वाढ झाली आहे. पर्यायाने जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतून आर्थिक व्यवहारही प्रचंड वाढत असल्याचे चित्र आहे.

या सर्व प्रकाराना रायगड विभागांतील सर्व डेपो - स्टँड आणि प्रवाशी यांची डरपवश्रळपश व्दारे आसणारा संर्पक (conectiviti) नसल्याने प्रवाशाना योग्य सेवा देता येत नाही अशी तक्रार सर्व डेपो, स्टँड व प्रवासी संघटनांकडून होत आहे.

कनेक्टिंग पीपल असे ब्रीद वाक्य असलेल्या बीएसएनएलची सेवा रायगड विभागातील आलिबाग, पेण, कर्जत, श्रीवर्धन,महाड, माणगाव, रोहा, मुरुड या डेपोंतून आणि त्या अंर्तगत येणाऱ्या महाड, पोलादपूर, आंबेत, श्रीवर्धन, म्ह-सळा, बोर्ली, माणगाव, गोरेगांव, इंदापूर, तळा, मुरुड, रेवदंडा, अलिबाग, रेवस, पोयनाड, वडखळ, नागोठणे, पाली, पेण, रामवाडी, खोपोली, कर्जत या सर्व स्टँडमध्ये असणारे Bsnl चे Landline फोन बंद असल्याने प्रवशाना पारदर्शक सेवा देत येत नाही अशी तक्रार एस.टी. डेपो व्यवस्थापनाची आणि प्रवासी, विविध प्रवासी संघटनांची आहे.

## खांदेश्वर रेल्वे स्टेशन ते खांदा कॉलनी, नवीन पनवेल या मार्गावर बस सेवा सुरू करण्यासाठी निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा कॉलनी ते खांदेश्वर रेल्वे स्टेशन जाणाऱ्या प्रवासाची सख्या ५ हजार हुन आधिक आहे. तसेच या भागात रिक्षा मीटर प्रमाणे सुरू नसल्याने प्रवास खूप महाग झाला आहे. शिवाय खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात पार्किगसाठी जागा उपलब्ध नसल्याने स्वतः ची गाडी असूनही रिक्षावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे खांदेश्वर रेल्वे स्टेशन ते खांदा कॉलनी,नवीन पनवेल या मार्गावर बस सेवा सुरू करण्यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

पेट्रोल -डिझेलच्या वाढत्या किंमतीमुळे प्रवास महागला आहे. खांदा कॉलनी-नवीन पनवेल मधील बस सेवा परत सुरु करावी यासाठी नवी मुंबई महानगरपालिका परिवहन मंडळचे व्यवस्थापकाना अखिल भारतीय छावा संघटना संघटनेतर्फे निवेदन देण्यात आले. आधी सुरु असलेले ५९ नंबरची बस पुन्हा सुरु करण्याचे आश्वासन नवीमुंबई परिवहनच्या वतीने देण्यात आले. बस मार्ग हा पनवेल रेल्वेस्थानक पासून अभ्युदय बँक, बांठिया विद्यालय, कालिकामाता मंदिर, अयप्पा मंदिर, तेरणा हॉस्पिटल, आदई सर्कल, शिवम आर्किट, तलाव, सूर्यदर्शन सोसायटी, आदई फाटा, डॉ.आंबेडकर उड्डाणपूल, पेट्रोल पंप, आयकर ऑफिस, मोठा खांदा ते खांदेश्वर रेल्वेस्थानकापर्यंत असेल. यावेळी अखिल भारतीय छावा संघटना रायगड जिल्हा अध्यक्ष प्रसाद परब, पनवेल अध्यक्ष प्रविण जठार, शशी नायर आणि महिला संघटक सुमती सरगर उपस्थित होते.

## प्रशासकीय सेवेत आस्थापना विषयक अद्यावत माहिती आवश्यक : मकरंद देशमुख

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

शासकीय सेवेत आस्थापना विषयक बाबींची अद्यावत माहिती असणे आवश्यक असून त्या माध्यमातून प्रशासन गतिमान होण्यास मदत होते. यासाठी आस्थापना विषयक कार्यशाळा महत्त्वाची असल्याचे मत उपायुक्त महसूल श्री.मकरंद देशमुख यांनी आज येथे व्यक्त केले.

कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्यावतीने विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आस्थापना विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्री. देशमुख बोलत होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक माहिती प्रशासन श्री.गोविंद अहंकारी, सेवानिवृत्त अवर सचिव श्री.रा.ना.मुसळे प्रमुख पाहुणे म्हणन उपस्थित होते. कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, रत्नागिरीचे जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर, रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, ठाणे जिल्हा माहिती अधिकारी अजय जाधव, पालघर जिल्हा माहिती अधिकारी राहूल भालेराव आणि माहिती व जनसंपर्क कोकण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. शासकीय नस्तीमध्ये दडलेली मानवी समस्या काढतानाच प्रशासनात यशस्वी प्रशासक व्हावेत हा हेतू डोळ्यासमोर ठेवून कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ.मुळे यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या आस्थापना विषयक मार्गदर्शिका मे २०२२ या पुस्तिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

यावेळी श्री.देशमुख म्हणाले की, आस्थापना विषय काम करताना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शासननिर्णय, शासन परिपत्रक याबाबतीत अद्यावत असणे आवश्यक आहे. शासकीय प्रकरणे हाताळताना ही प्रकरणे न्यायालयीन दृष्टीकोनातून हा-ताळणे महत्वाची आहेत. त्यासाठी संबंधितांनी त्या प्रकरणांचा सखोल अभ्यास करावा.

श्री.मुसळे यांनी आस्थापने विषयीच्या प्रमुख मुद्यांवर तपशिलवार माहिती दिली. आस्थापना विषयक काम करताना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी, कर्मचाऱ्यांनी नियमांच्या चौकटीत राहून कसे काम करावे, वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले शासननिर्णय आणि परिपत्रकांचे सतत वाचन करुन कसे अद्यावत राहावे, अशा महत्त्वाच्या बाबीं विषयी मार्गदर्शन केले. यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामात आस्थापना विषयी विविध प्रश्नांबाबत चर्चा केली. या प्रश्नांना श्री. मुसळे यांनी समाधानकारक उत्तरे दिली.



## उरणमध्ये २७ ते २९ मे ला मनसेचा उरण महोत्सव

**दै.रायगड नगरी । उरण**

येत्या २७ ते २९ मे ०२२ रोजी उरण येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उरण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.बोकडविरा येथील सिडकोच्या मैदानात होणाऱ्या या महोत्सवात विविध प्रकारच्या स्टॉल्स ची रेलचेल असणार आहे.कोरोना काळात घरात अडकून पडलेल्या जनतेला मोकळा श्वास घेण्यासाठी महोत्सव ही पर्वणी ठरते. त्या अनुषंगाने उत्तर रायगड मनसेच्या माध्यमातून २७,२८,२९ मे ०२२ रोजी उरण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

काल उरण येथे आयोजित पत्रकार परिषदेत मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांनी ही माहिती दिली. बोकडविरा येथील सिडकोच्या मैदानात होणाऱ्या या भव्य महोत्सवात विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल्स,प्रॉपर्टी एक्स्पो,ऑटोमोबाइल्स, लोजेस्टीक जॉब फेर यांचा प्रामुख्याने समावेश असणार आहे.या महोत्सवात मासळी महोत्सव हा विभाग जास्तीतजास्त पर्यटकांना आकर्षित करणारा असणार आहे.या महोत्सवात पाककला स्पर्धा,विविध मसाल्याचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे महिला बचत गटांनी बनविलेल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळावी म्हणून त्यांना मोफत स्टॉल देण्यात येणार आहे.या महोत्सवासाठी मनसेच्या विविध नेत्यां बरोबरच मराठी सिने सृष्टीतील अनेक कलावंत हजेरी लावणार असल्याने ते आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहेत. या पत्रकार परिषदेसाठी मनसे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, मनसे रोजगार स्वयंरोजगार विभागाचे अध्यक्ष महेंद्र बैसाने,यांच्यासह ज्येष्ठ नेते सत्यवान भगत,सिद्धी आंगणे,रितेश पाटील,राकेश भोईर,संगीता ढेरे,अल्पेश कडू,,प्रणव कारखानीस आदी उपस्थित होते.